**<u>आदेश नि. यु-६</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज मुळ अर्जात दुरूस्ती करणेकरीता म्हणून दाखल करण्यात आलेला आहे. अर्जदारांचे असे प्रतिपादन आहे की, त्यांच्या अर्जातील नमुद केलेल्या रकमा आणि वर्ष या अनुषंगाने दुरूस्ती करणे आहे. तरी उपरोक्त दुरूस्त्या करण्याची परवानगी देण्यात येवून अर्ज मंजुर करण्यात यावा, अशी विनंती अर्जदार करतात.

२) प्रस्तुतच्या अर्जावर प्रतिवादी ह्यांनी जोरदार हरकत नोंदवून असे प्रतिपादन केले आहे की, अर्जदारांचा अर्ज मोघम स्वरूपाचा असून विस्तृतपणे कशी दुरूस्ती करायची आहे हे नमुद केलेले नाही, दुरूस्ती करण्यासाठी कारण काय घडले याबाबचा खुलासा केलेला नाही, त्यामुळे हे स्पष्ट होते की, अर्जदारांना त्यांच्या झालेल्या चुका दुरूस्त करण्याकरीता आणि प्रतिवादींची लेखी कैफियत आल्यानंतर दिलेला आहे, जो फेटाळण्यास पात्र ठरतो.

३) अर्जदारांचा अर्ज आणि युक्तिवाद, त्या अनुषंगाने प्रतिवादींचे कथन आणि युक्तिवाद आणि अभिलेखावर दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर हे स्पष्ट होते की, प्रतिवादींच्या या युक्तिवादामध्ये पुर्णपणे तथ्य आहे की, प्रस्तुतच्या दुरूस्तीच्या अर्जामध्ये कोणतेही गुण नाहीत, त्याचे कारण असे की, प्रतिवादींनी अभिलेखावर लेखी कैफियत दाखल केल्यानंतर आणि या प्रकरणात मुद्दे पारित झाल्यानंतर जेव्हा प्रकरण अर्जदारांच्या पुराव्याकरीता म्हणून नेमण्यात आले त्यावेळी हा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

त्याचबरोबर, प्रतिवादींच्या या युक्तिवादामध्ये देखील तथ्य आढळते की, दुरूस्ती अर्जामध्ये अर्जदारांनी दुरूस्ती करण्याकरीता म्हणून कोणतेही योग्य व न्याय्य कारण दिलेले नाही आणि त्यामुळेच हे स्पष्ट होते की, प्रस्तुतचा अर्ज हा ढोबळमानाने करण्यात आलेला आहे, ज्यामुळे तो पुर्णपणे फेटाळण्यात येत आहे.

स्वा/-

**दिनांक :- २७.०५.२०२५**

**(शार्दुल श. जहागीरदार)**
**न्यायाधीश,**

**ठिकाण :- बुलढाणा.**

**कामगार न्यायालय, बुलढाणा.**